# अन्नदान सेवा भक्ती – द्रौपदीची अक्षय्य थाळी

अन्नदानाचे महत्त्व प्रत्येकाला माहित आहेच. कलियुगात अन्नदानाचे फार मोठे महात्म्य आहे. आपल्या मनातील अनंत इच्छा, कल्पना अन्नदानाने पूर्ण होवू शकतात. याचबरोबर आपल्या ऐहिक आणि पारलौकीक जीवनातील अडचणी आणि संकटे यांचे निवारण अन्नदानाने होते. आपल्याला किंवा आपल्या कुटुंबियात जर कुणाला असाध्य रोगाने ग्रासले असेल तर अन्नदानाने त्या रोगांपासून सुटका होवू शकते. अन्नदानाचे चमत्कार विलक्षण आहेत. त्याचा अनुभव प्रत्येकाने घेतला पाहिजे, मात्र अन्नदान हे सत्पात्री असले पाहिजे. ज्याला खरोखर आवश्यक आहे त्याला अन्न दिल्याने त्याचा जो आशिर्वाद मिळतो तो आपल्या जीवनात चमत्कार निर्माण करतो, सदिच्छा, मनापासून दिलेले आशिर्वाद, पोट भरल्यावर तृप्तीने दिलेला दुवा हा अमूल्य असतो. प्रत्येकाचे पोट म्हणजे जणू यज्ञकुंडच असते. त्या अग्नीमध्ये अन्नाचा घास पडल्यावर मिळणारा आशिर्वाद म्हणजे जणू त्या यज्ञाचे फळच असते. “ जे जे भेटी जे भूत । ते ते मानिजे भगवंत ॥” असे संत तुकारामांनी म्हटले आहे. तसेच “ शिवभावे जीवसेवा” असे स्वामी विवेकानंदांचे गुरु रामकृष्ण परमहंसांनी म्हटले आहे. प्रत्येक जीव, मनुष्य, प्राणी यांच्या पोटातील जठरामध्ये जो अग्नी रोज प्रज्वलीत होतो त्यात अन्नाची आहुती पडली म्हणजे तो त्यादिवशीचा यज्ञ पूर्ण होतो. त्या अग्नीने रोज कोट्यावधी लोक भुकेने तळमळत, उपाशी पोटी झोपतात म्हणजे त्यांच्या पोटातील यज्ञाला आहुती मिळत नाही. तो तसाच विझतो. देशातील प्रत्येक व्यक्तीला, आपल्या प्रत्येक बंधू भगिनीला रोज पोटभर जेवायला तरी मिळायला पाहिजे. त्याच्या पोटातील यज्ञ रोज पूर्ण झाला पाहिजे. मात्र याचबरोबर ज्यांची पोटे तुडुंब भरली आहेत, ज्यांचेकडे भरपूर संपत्ती आणि साधने आहेत त्यांना अन्न दान देवून त्याचा काडीचाही उपयोग होत नाही. अनेकदा कितीतरी व्यक्ती पुण्य कमवायच्या आशेने विशिष्ठ व्यक्तींना अन्नदान करतात. पंचपक्वांनांचे जेवण घालतात. मात्र त्याचा उपयोग होत नाही. मग नैराश्य येते तसेच भिका-यांना अन्न देवून वाया जाते. कारण त्यांचेकडे तो भाव नसतो, कृतज्ञतेची जाणीव नसते. तू दिले नाहीस तर दुसरा देईल असे ते निर्लज्ज असतात. त्यांना त्याची किंमत नसते. त्यांच्या चेह-यावरचे भाव नाटकी आणि फसवणारे असतात. त्यामुळे अन्नदान हे सत्पात्री हवे.

खरेतर कोणतेही दान सत्पात्रीच हवे. त्यामुळे विविध समारंभ, लग्न किंवा इतर प्रसंगी, सणासुदीला ज्या आपण भेटी देतो, दान करतो किंवा आहेर करतो ते देत असताना प्रत्येकाने “आपण ज्याला हे देत आहोत त्याला याची खरोखरच किती गरज आहे?” असा विचार केला पाहिजे. जर त्याला गरज नसल्यास ज्याला खरोखर गरज आहे त्याला आपण भेट दिली, वस्तू दिल्या, अन्नदान केले तर त्याला त्यांचा उपयोग होईल आणि तो अंत:करणपूर्वक आपल्याला दुवा देईल. ज्याला गरज नाही त्याचेकडे वस्तूंची आणि सामानांची अनावश्यक गर्दी होणार नाही. “ भुकेल्या पोटाला प्रथम अन्न द्या ” असे स्वामी विवेकानंदानीही ठणकावून सांगितले आहे. आज भारतात ५०% हून अधिक लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. ते एकतर उपाशी राहतात किंवा त्यांना एकवेळच जेवायला मिळते. प्रत्येक युगाचे एक पुण्यदायी कर्म आहे. जसे सत्ययुगाचे पुण्यदायी कर्म तप हे होते, त्रेतायुगाचे पुण्यदायी कर्म साधना हे होते, द्वापार युगाचे पुण्यदायी कर्‍म यज्ञ हे होते तसे कली युगाचे पुण्यदायी कर्म दान हे आहे. त्यातही भुकेल्याला अन्नदान हेच मुख्य पुण्यदायी कर्म आहे. तसेच कलियुगाचे एक अनोखे वैशिष्ट्ये आहे, ते म्हणजे कलियुगात सत्कर्माचे फळ त्वरीत मिळते. सत्य युगामध्ये ९०% सत्य आणि १०% असत्य असते. त्रेता युगामध्ये ७०% सत्य आणि ३०% असत्य असते द्वापार युगात ३०% सत्य आणि ७०% असत्य असते आणि कलियुगात १०% सत्य आणि ९०% असत्य असते. याचा अर्थ कुठल्याही युगात पूर्णपणे १००% सत्य किंवा पूर्णपणे १००% असत्य अशी स्थिती नसते. सत्य युगामध्ये १० वर्षे सतत अनुष्ठान, तपश्चर्या, सत्कर्म, अन्नदान इ. करुन जेवढे फळ मिळते तेवढे फळ त्रेता युगात एक वर्ष तितकीच सत्कर्मे करुन मिळते. द्वापार युगात तेवढेच फळ मिळवायला एक महिना सतत अनुष्ठान आणि सत्कर्मे करावी लागतात आणि कलियुगात फक्त एक दिवस जर सत्कर्मे , साधना आणि अनुष्ठान केले तर तेवढेच फळ मिळते. याचा अर्थ सत्य युगात जे फळ मिळायला १० वर्षे साधना करावी लागेत असे तेच फळ कलियुगात फक्त एक दिवस अन्नदान आणि सत्कर्मे करुन मिळते. खर हि कलियुगाची अद्भुत उपलब्धी आहे.

कर्दळीवन सेवा संघातर्फे अन्नदान भक्ती सेवा म्हणून “ द्रौपदीचि थाळी ” ही अन्नदान सेवा सुरु करण्यात आली आहे. या सेवे अंतर्गत देशातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने अन्नदान करावे आणि ते आवश्यक त्या व्यक्तींपर्यंत पोहोचावे अशी रचना केली आहे. ज्याप्रमाणे महाभारतात वनवासात असताना भगवान श्रीकृष्णाने द्रौपदीला अक्षय थाळी दिली होती. त्यायोगे भयंकर अरण्यात जरी

कितीही अतिथी, ऋषी, मुनी, देवगण आले तरी त्यांना पोटभर अन्न देवू शकेल अशी त्या अक्षय थाळीची ख्याती होती. त्याच धर्तीवर श्रीदत्त आणि श्री स्वामी समर्थांच्या सर्व भाविक भक्तांच्या आणि सर्व नागरिकांच्या सहाय्याने " द्रौपदीची थाळी " ही अन्नदान सेवा योजना आकाराला आली आहे. यामध्ये जमा होणारी रक्कम ही धान्यरुपाने समाजातील उपेक्षित, गरजू कुटुंबांना आणि संस्थांना देण्यात येणार आहे.

(१) अनेक व्यक्तींना मनापासून अन्नदान करायची इच्छा असते पण ते त्यांच्या जीवनात इतके व्यस्त असतात कि त्यांना त्यासाठी वेळ मिळत नाही. शिवाय धान्य किंवा अन्न घेवून ते देण्यासाठी घेणा-याला कोठे शोधत जायचे, असे त्यांना वाटते.

(२) अनेकांना द्यायची इच्छा असते. पण त्यांना संकोच वाटतो. घेणा-याने न घेता आपला अपमान केला तर काय करायचे अशी सुप्त भीती असते.

(३) अनेकांना अन्नदान करायचे असते पण त्यात परिस्थितीमुळे किंवा स्वभावामुळे चालढकल होत राहते आणि ते पुढे पुढे ढकलले जाते.

(४) अनेकांना अन्नदानाचे महत्त्व आणि ते का करावे हेच माहित नसते मात्र एकदा समजून घेतल्यावर ते करायची त्यांची तयारी असते. इ. इ. इ.

**या सेवेचे स्वरुप खालील प्रमाणे**

**" द्रौपदीची थाळी "** या अक्षय अन्नदान पात्रामध्ये सहभागी होण्यासाठी प्रत्येक व्यक्ती, बंधू – भगिनी, संस्था, कंपनी इ. कोणीही खालील प्रकारे सहभागी होवू शकतो.

(१) स्वत: अन्नदानासाठी रक्कम देवून : यामध्ये एकावेळी किमान रु. ५०१ आणि त्यापेक्षा जास्त रक्कम स्वीकारली जाईल

(२) दरमहा किमान रु. १००० किंवा वर्षाचे एक रकमी रु. १२,००० देवून

(३) दरमहा रु. २०००, रु. ३०००, रु. ५००० किंवा रु. १०,००० देवून

(४) एक रकमी रु. १० ह. ५० ह. किंवा १ लाख रुपये देवून

(५) आपल्या घरातील प्रत्येक व्यक्तीच्या वाढदिवशी, स्मृतीदिनी रु. १०००, रु. २०००, रु. ५०००, रु. १०,००० अशी रक्कम देवून

(६) आपल्या कुटुंबातील विशेष प्रसंगी (उदा. लग्न, मुंज, साठी, निवृत्ती, पुरस्कार प्राप्त झाल्यावर इ.) रु. ५०००, रु. १०,०००, रु. २१,०००, रु. ५०,०००, रु. १ लाख एवढी रक्कम देवून

(७) आपले कुटुंबिय, नातेवाईक, मित्र, सहकारी, व्यावसायिक सहयोगी इ. सर्वांना अन्नदान विषयी आणि द्रौपदीची थाळी या योजनेसंबंधी माहिती देवून आणि त्यांना उद्युक्त करुन.

(८) या सेवेची माहिती ईमेल द्वारा, एस.एम.एस द्वारा, फेसबुक द्वारा बोलता बोलता इतरांना सांगून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे.

(९) या योजनेबाबत स्वत:हून पुढाकार घेवून त्याची माहिती विविध कार्यक्रमातून सांगणे त्याचा प्रचार आणि प्रसार करणे वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये लिहणे, याबाबात जागृती निर्माण करणे.

(१०) लोकांचे अनुभव एकत्र करणे, जे एकमेकांना सांगणे, त्यासंदर्भात विचारांचे आदान प्रदान करणे इ.

(११) अतिथी सेवा, अतिथी धर्म आणि अन्नदान या विषयी जागृती निर्माण करणे त्याची पुर्न:स्थापना करणे.

खरेतर कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबिलिटी म्हणजे उद्योजक आणि व्यावसायिक यांनी समाज सेवा करावी किंवा सरकारने समाजासाठी आणि जनतेसाठी काहीबाही करावे यासंदर्भात अनेकदा चर्चा होते आणि लोक तोंड दुखे पर्यंत चर्चा करीत राहतात. पण स्वत: व्यक्तीश: काय करावे या संदर्भात कृती तर राहिली दूरच, पण त्याबाबत एक शब्दही त्यांचे तोंडातून निघत नाही. निस्वार्थ हा सगळयात मोठा स्वार्थ आहे. परंतु त्याचा अनुभव घ्यायला कोणीही तयार नाही. एक दाणा दिल्यावर भगवंत हजारो दाण्यांनी त्याची भरपाई करतो. पण आपल्याकडचा दाणा द्यायला कुणीच तयार नाही. याउलट अधिकाधिक संपत्ती आपल्या साठी आणि पुढील पिढ्यांसाठी मुर्खासारखी साठवून ठेवायची स्पर्धा सुरु आहे. बरे जाताना तर यातील एकही वस्तू बरोबर घेवून जाता येत नाही. ज्यांच्यासाठी ती संपत्ती गोळा केली त्यांना

त्याची काडीइतकी किंमत नसते. फुकट मिळालेली संपत्ती उधळून टाकायला ते बसलेले असतात. हि वस्तुस्थिती प्रामाणिकपणे समजावून घेवून प्रत्येकाने किमान दरमहा काही रक्कम अन्नदानासाठी खर्च करावी आणि आपल्या जीवनात विलक्षण अनुभव घ्यावेत. आपली सर्वार्थाने प्रगती होत असताना आपल्या बंधू भगिनींना किमान रोज दोन घास पोटभर खायला मिळावे यासाठी आपण स्वत:हून पुढे यावे आणि या द्रौपदीच्या अक्षय्य थाळीत मनापासून सहभागी व्हावे.

या द्रौपदीच्या थाळी अंतर्गत जमा होणा-या रकमेतून समाजातील गरजू, उपेक्षित आणि पीडीत व्यक्तींना धान्य पुरविले जाईल. ज्यांना गरज आहे अशा कुटुंबियांच्या / व्यक्तींचा शोध घेतला जाईल. त्यांचेपर्यंत आत्मीयतेने अतिप्रेमाने धान्य पोहोचवले जाईल. प्रत्येक धान्याचा कण सत्पात्री आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचेल याची काळजी घेतली जाईल. या देशात एक दिवस तरी असा उगवेल की कोणीही उपाशी झोपणार नाही. द्रौपदीच्या अक्षय्य थाळीच्या रुपाने प्रत्येकाची किमान अन्नाची गरज भागली जाईल असे स्वप्न आहे सर्वांच्या सहकार्याने ते साकार होईल असा विश्वास वाटतो.

कर्दळीवन सेवा संघातर्फे रु. १,००,०००/- (रुपये एक लाख) देवून या द्रौपदीच्या थाळीचा शुभारंभ केला आहे. लवकरात लवकर दरमहा रु. १००० देणा-या किमान १०,००० व्यक्तींनी या द्रौपदीच्या थाळीत सहभागी व्हावे असा प्रयत्न सुरु आहे. श्रीदत्त संप्रदायाच्या आणि श्री स्वामी समर्थ संप्रदायामध्ये “ अन्नदान ”आणि अतिथी सेवा यांचे अपार महत्त्व आहे. श्रीदत्तप्रभूंच्या आणि श्री स्वामींच्या आशिर्वादाने या द्रौपदीची थाळीचा लवकरच विस्तार होवून देशातील सर्व गरजू व्यक्तींना तिचा आधार मिळेल अशी खात्री आहे. आपण प्रत्येकाने यामध्ये सहभागीहून त्याला हातभार लावावा, ही प्रत्येकाचे चरणी विनम्र प्रार्थना आहे.

या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी कृपया आपली रक्कम खालिल खात्यामध्ये रोखीने, चेक द्वारा किंवा ऑनलाईन NEFT  ट्रान्सफर करून भरता येईल.

खात्याचे नाव – **कर्दळीवन सेवा संघ ट्रस्ट**

बॅंकेचे नाव – **स्टेट बॅंक ऑफ इंडिया** डेक्कन जिमखाना पुणे शाखा

**बचत खाते क्र. – ३३३९१६४५३१४**      IFS Code – SBIN0001110